आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१८ मे २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ७ सर्वपक्षीय प्रतिनिधी मंडळं जाहीर

- आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून पाकिस्तानला अर्थसहाय्य योजनेच्या पुढल्या टप्प्यासाठी ११ नवीन अटी

- नवनियुक्त पोप लिओ चौदावे यांचा शपथविधी

- हैद्राबादच्या चारमिनार परिसरातल्या गुलजार हाऊसला लागलेल्या आगीत १७ जणांचा मृत्यू

- कोकण, गोवा, कर्नाटक आणि केरळमधे येत्या शनिवारपर्यंत जोरदार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जचा राजस्थान रॅायल्सवर १० धावांनी विजय

**<><><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची सामूहिक भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं लवकरच वेगवेगळ्या देशांना भेट देणार आहेत. या संदर्भात, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या शिष्टमंडळांचं नेतृत्व करणाऱ्या खासदारांची आणि सदस्यांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार,

भाजपा खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालचा पहिला गट सौदी अरेबिया, बहरीन, कुवेत आणि अल्जेरियाला भेट देईल.

भाजपा खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालचा दुसरा गट यूके, फ्रान्स, जर्मनी, युरोपियन युनियन, इटली आणि डेन्मार्कला भेट देईल.

जदयू चे खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालचा तिसरा गट इंडोनेशिया, मलेशिया, दक्षिण कोरिया, जपान आणि सिंगापूरला भेट देईल.

शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचा चौथा गट युएई, लायबेरिया, काँगो आणि सिएरा लिओनला भेट देईल.

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालचा पाचवा गट अमेरिका, पनामा, गयाना, ब्राझील आणि कोलंबियाला भेट देईल.

द्रमुक खासदार कनिमोई  करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालचा सहावा गट स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशियाला भेट देईल.

आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालचा सातवा गट इजिप्त, कतार, इथिओपिया आणि दक्षिण आफ्रिकेला भेट देईल.

**<><><><><><>**

आयएमएफ, अर्थात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं आपल्या अर्थसहाय्य योजनेच्या पुढल्या टप्प्यासाठी पाकिस्तानवर ११ नवीन अटी लादल्या आहेत, तसंच पाकिस्तानच्या भारताबरोबरच्या तणावपूर्ण संबंधांमुळे योजनेच्या आर्थिक, परराष्ट्र, आणि सुधारणा विषयक उद्दिष्टांना धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. नवीन अटींमुळे,  आयएमएफ नं पाकिस्तानवर लादलेल्या अटींची एकूण संख्या ५० वर गेली आहे.

नवीन अटींमध्ये १७ हजार  ६०० अब्ज रुपयांच्या नवीन अर्थसंकल्पाला संसदीय मान्यता, वीज बिलांवर कर्ज सेवा अधिभारात वाढ आणि तीन वर्षांपेक्षा

जास्त वापर झालेल्या जुन्या कारच्या आयातीवरचे निर्बंध उठवणं, यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

व्हॅटिकन सिटीमधल्या सेंट पीटर चाैकात आज नवे पोप लिओ चौदावे यांचा शपथविधी सोहळा संपन्न झाला. यावेळी कार्डिनल डॉमिनिक माम्बर्टी यांनी पोप लिओ चौदावे यांना विधिवत पॅलियम अर्पण केला आणि ते चर्चचे प्रमुख असल्याची औपचारिकता पूर्ण केली.

या ऐतिहासिक सोहळ्यात अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स, परराष्ट्र सचिव मार्को रुबिओ, युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की तसंच कॅनडा आणि ऑस्ट्रेलियाच्या प्रधानमंत्र्यांसह जगभरातले अनेक प्रमुख नेते आणि धर्मगुरू सहभागी झाले.

यावेळी पोप लिओ यांनी पहिला धर्मोपदेशही दिला. सर्वांनी एका कुटुंबाप्रमाणे एकजूट होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. नागपूर जिल्ह्यात सावनेर इथं निघालेल्या तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस सहभागी झाले होते. बातमीदारांशी बोलताना त्यांनी सांगितलं…

**होल्ड - बाईट- फडनवीस (१६ सेकंद)**

नागपुरात भाजपा प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात सिंदूर सन्मान तिरंगा यात्रा काढण्यात आली. जालना शहरात आयोजित तिरंगा रॅलीत माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार अर्जुन खोतकर, नारायण कुचे, आणि संतोष दानवे सहभागी झाले. यावेळी रावसाहेब दानवे म्हणाले…

**होल्ड बाईट -रावसाहेब दानवे (२३ सेकंद)**

आमदार अर्जुन खोतकर म्हणाले…

**होल्ड बाईट -अर्जुन खोतकर (१६सेकंद)**

सेना पदक प्राप्त माजी कॅप्टन भानुदास शिरसाट यांनी सांगितलं….

**होल्ड बाईट -भानुदास शिरसाट (२८ सेकंद)**

मुंबईत कांदिवली आणि बोरिवली इथं, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात फुलंब्री, सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड, **सांगली** जिल्ह्यात शिराळा इथं, तसंच वाशिम शहरातही आज तिरंगा यात्रा काढण्यात आली.

**<><><><><>**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी हा तिचा आत्मा आहे. त्यामुळेच विकसित भारत घडवायचा असेल, तर विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी यावर आपल्याला भर द्यावा लागेल, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं. नागपूर इथे विकसित कृषी या विषयावरच्या उच्चस्तरीय बैठकीवेळी ते बोलत होते.

विकसित, गरिबीमुक्त गाव हे आपल्या सरकारचं लक्ष्य असून त्यासाठी योग्य ती पावलं उचलली जात आहेत. कृषि क्षेत्रातल्या विविध संस्था स्वतंत्रपणे कार्य करत असून जर या संस्थांचा आपापसात समन्वय साधला आणि त्यांना योग्य दिशा दिली तर कृषिक्षेत्रात चमत्कार होऊ शकतो. त्यामुळे आता एक देश, एक राज्य, एक कृषी आणि एक पथक अशा योजनेची आपण घोषणा करत असल्याचंही चौहान यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

हैद्राबादच्या चारमिनार परिसरातल्या गुलजार हाऊसला आज सकाळी लागलेल्या आगीत १७ जणांचा मृत्यू झाला. मृतांमधे ८ लहान मुलं आणि ६ महिलांचा समावेश आहे. गजबजलेल्या परिसरातल्या या दुमजली इमारतीत शॉर्टसर्किटमुळं ही आग

लागली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. ८ जणांचा धुरामुळे गुदमरुन मृत्यू झाला, तर ९ जण उपचारादरम्यान मरण पावले.

केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली तसंच पीडितांना सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन दिलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. तेलंगण सरकारनं मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट इथे आज पहाटे एका कापड कारखान्याला लागलेल्या आगीत ८ जण मरण पावले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केलं आणि संध्याकाळी साडे पाचच्या सुमाराला ही आग आटोक्यात आणली. या आगीतून तीन जणांना बाहेर काढलं असून त्यांना रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

कोकण, गोवा, कर्नाटक आणि केरळमधे आजपासून २४ मे पर्यंत जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. ईशान्य भारत, पश्चिम बंगालमधील हिमालयाचा पायथा, सिक्किम मधे पुढच्या पाच ते सहा दिवसांत विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

पश्चिम राजस्थान आणि जम्मू काश्मीरमधे गुरुवारपर्यंत उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. ओदिशामधेही आज आणि उद्या उष्ण आणि दमट हवामान राहण्याचा अंदाज आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जनं राजस्थान रॉयल्सवर १० धावांनी विजय मिळवला. पंजाब किंग्जनं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात ५ गडी गमावून २१९ धावा केल्या. नेहाल वढ्रेरानं सर्वाधिक ७०, तर शशांक सिंगनं नाबाद ५९ धावांचं योगदान दिलं.

या धावसंख्येचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सच्या यशस्वी जैसवाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी तडाखेबंद सुरुवात केली. मात्र हे दोघं बाद झाल्यानंतर ध्रुव जुरेलच्या ५३ धावांचा अपवाद वगळता इतरांना चांगली कामगिरी करता आली नाही. त्यामुळे ते २० षटकात ७ गडी गमावून २०९ धावाच करु शकले.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना दिल्लीत अरुण जेटली स्टेडिअमवर दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा दिल्ली कॅपिटल्सच्या ७ षटकात १ बाद ५० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

प्राथमिक कृषी पत पुरवठा संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी नवीन धोरण जाहीर करण्याचा विचार केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी आज व्यक्त केला. अहमदाबाद इथं गुजरात राज्य सहकार संघटनेनं आयोजित केलेल्या सहकार परिषदेला ते आज संबोधित करत होते. २०२९ पर्यंत देशातल्या प्रत्येक ग्राम पंचायतीमधे प्राथमिक कृषी पत पुरवठा संस्था स्थापन करण्यात येणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नौवहन उद्योगात महिलांना अधिक संधी उपलब्ध करुन दिल्यानं महिला सक्षमीकरणाचं उद्दिष्ट साध्य करतानाच नौवहन क्षेत्रात नवोन्मेष आणि मजबुतीकरणाला चालना मिळेल, असं केंद्रीय बंदर आणि नौवहन मंत्री सर्वानंद

सोनोवाल यांनी म्हटलं आहे. नौवहन क्षेत्रातल्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आज मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था - इसरोने आज ईओएस - झिरो नाईन या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचं प्रक्षेपण केलं, मात्र उड्डाणाच्या तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाडामुळे ही मोहिम अयशस्वी झाल्याचं, इसरोचे अध्यक्ष व्ही नारायणन यांनी सांगितलं.

**//<><><><><><>//**